# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 2988 दिनांक : ०६.११.२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ: - मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/१४३४५ दि. ४.११.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

महाडीबीटी पोर्टलवरुन महाविद्यालयांनी त्यांचे डीबीटी पोर्टलवर पप्रोफाईल अद्ययावत करणे / महाविद्यालयातील अभ्यासक्र माच्या शुल्कास संबंधित शिक्षण शुल्क समिती / FRA / सहसंचालक कार्यालय यांचेकडून मंजूरी घेणे, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणे, सदर अर्जांची महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्य तसेच विभाग स्तरावरुन पडताळणी करणे याबाबत अंतिम मुदत खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | अंतिम मुदत |
|---|---|---|
| ०१. | **महाविद्यालयांनी त्यांचे डीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करणे/ महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक /शिक्षण शुल्क समिती/ FRA यांचेकडून मंजूरी घेणे.** | **दि. १५.११.२०१९** |
| ०२. | **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे.** | **दि. १५.११.२०१९** |
| ०३. | **महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यांनी त्यांचे लिपीक व प्राचार्य यांचे लॉगीनवरुन अर्जांची पडताळणी करणे.** | **दि. ३०.११.२०१९** |

मा. संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार, महाविद्यालयांनी त्यांचे डीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करणे/ महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक /शिक्षण शुल्क समिती/ FRA यांचेकडून मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली असल्याबाबतचा पूर्तता अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा. दि. ४.११.२०१९ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार, खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्राप्त अर्जांची संख्या | संस्था स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे | ३८१९९ | २४१२४ |

तरी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. तसेच संस्था / महाविद्यालय / विद्यापीठांच्या लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध असलेल्या अर्जांची रोजच्या रोज (DAILY BASIS) पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्था / महाविद्यालय / विद्यापीठांच्या लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. **तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.**

**(डॉ. विजय नारखेडे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.